**नवी मुंबई महानगरपालिका**

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 63 नुसार महानगरपालिकेच्या कर्तव्यांचा खालील प्रमाणे अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

1) शहरातील निवडक रस्ते, पदपथ व जागा यांची झाडलोट व साफसफाई करणे आणि तेथुन केरकचरा काढून नेणे;

2) शहरातील गृहनिर्माण संस्था, औद्योगिक युनिट, शैक्षणीक व वाणिज्य संकुले येथुन निर्माण होणाऱ्या कचऱ्याची वाहतुक करणे व त्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे.

3) नाले व निस्सारणाची कामे करणे व तत्सम सोई करणे, सुस्थितीत ठेवणे व त्याची साफसफाई करणे.

4) पावसाळा पूर्व नैसर्गिक नाल्यातील अडथळे दूर करुन पाणी प्रवाहीत करणे.

या आदेशाद्वारे घनकचरा व्यवथापन विभाग, नमुंमपा यांचेकडील मुख्यालय स्तरावरील व विभाग स्तरावरील कामकरणाऱ्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कर्तव्याची सुची हि महाराष्ट्र महापालिका अधिनियम (सुधारीत) 2011 व घनकचरा व्यवस्थापन (हाताळणी) नियम 2016 मधील तरतुदीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली आहे.

कर्तव्य सुची व्यतिरिक्त कार्यलयीन कामे हि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या वरील नियंत्रीत अधिकाऱ्याच्या मार्गदर्शना खाली पार पाडावयाची आहेत.

| पदनाम | प्रकार | कार्य कर्तव्य |
|---|---|---|
| मुख्यालयीन स्तरावरील | स्थुल कामे (Macro) | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 63 नुसार महानगरपालिकेच्या कर्तव्यांचा व घनकचरा व्यवस्थापन (हाताळणी) नियम 2016 ची अंमलबजावणी करणेकरीता, राज्य शासनाच्या निर्देशानुसार, खालील प्रमाणे अंतर्भाव करण्यात आलेला आहे.<br>1) शहरातील निवडक रस्ते, पदपथ व जागा यांची झाडलोट व साफसफाई करणे आणि तेथुन केरकचरा काढून नेणे; बाबत धोरण निश्चित करणे.<br>2) शहरातील गृहनिर्माण संस्था, औद्योगिक युनिट, शैक्षणीक व वाणिज्य संकुले येथुन निर्माण होणाऱ्या कचऱ्याची वाहतुक करणे व त्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणेबाबतचे धोरण निश्चित करणे.<br>3) नाले व निस्सारणाची कामे करणे व तत्सम सोई करणे, सुस्थितीत ठेवणे व त्याची साफसफाई करणेबाबतचे धोरण निश्चित करणे.<br>4) पावसाळा पूर्व नैसर्गिक नाल्यातील अडथळे दूर करुन पाणी प्रवाहीत करणेचे धोरण निश्चित करणे.<br>5) ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा साठविणे व त्याची वाहतुक करणे संदर्भात नियोजन करणे.<br>6) विकेंद्रीकरण पध्दतीचा अवलंब करुन, कचरा निर्मीतीच्या ठिकाणीच ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खताची निर्मिती अथवा बायोगॅस करणेसंबधी गृहनिर्माण संस्था/व्यापारी संकुले यांना प्रोत्साहित करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | 7) घनकचरा व्यवस्थापन (हाताळणी) नियम 2016 मधील तरतुदी जनजागृती करणेकरीता, जाहिरात क्षेत्रातील कार्यरत तंत्रज्ञानाच्या मदतीने 1) डॉक्युमेंट्री फिल्म करणे 2) इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमाच्या सहाय्याने सिनेमागृहे, केबल नेटवर्क व सोशल मिडीयाचा वापर करुन, जनजागृती करणे.<br>8) जनतेचा सहभाग अभियानात घेणेकरीता, Self Help Group ना प्रोत्साहन देणे व त्यांच्या सहभागातून कचरा निर्मितीच्या ठिकाणी ओला व सुका कचरा वेगळा साठविणे व कचऱ्यापासून, wealth from waste हि संकल्पना जन मानसात रुजविणे व नियोजन पध्दतीने वृध्दीगत करणे.<br>9) सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने मोठ्या प्रमाणावर कचरा निर्मात्या सोबत करार करणे व त्यांच्याकडून वापर शुल्क (User Charges ) वसुलीबाबतचे धोरण सादर करणे.<br>10)घनकचरा व्यवस्थापन (हाताळणी) नियम 2016 ची अंमलबजावणी करणेसाठी विधी तज्ञाच्या सहाय्याने उपविधीचा प्रारुप तयार करणे व सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने अंमलबजावणी करणे.<br><br>11)सार्वजनिक रस्ते पदपथ व उपयोगाच्या जागा इत्यादी ठिकाणी केरकचरा, विष्टा, मलमुत्र करुन उपद्रव निर्माण करणाऱ्या व्यक्ती /संस्था यांचे विरुध्द दंडात्मक व कायदेशीर कारवाई करणेसंबधी सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने धोरण तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे.<br>12)कचरा वेचक कामगारास प्रशिक्षण देणे संबधी धोरण आखणे.<br>13)भाजी मार्केट, मच्छीमार्केट, मटन मार्केट, हार्कीटल वेस्ट इत्यादी व्यवसायातुन निघणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोयुक्त पध्दतीने त्याच ठिकाणी विल्हेवाट लावणे करीता, सेंद्रीय खताचा अथवा बायोगॅस प्लॅन्ट स्थापन करणे संबधी धोरण आखणे.<br>14) कम्युनिटी किचन करीता बायोगॅस प्लॅन्ट कार्यन्वीत करणेसंबधी धोरण आखणे व अंमलबजावणी करणे.<br>15)कचऱ्यापासून अर्थजन्य करणेकरीता विकेंद्रीकरण पध्दतीचा वापर करुन, मोठ्या गृहनिर्माण संस्था, व्यापारी संकुले, मॉल येथुन Bio-methanation microbial composting पध्दतीचा वापर |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यास प्रात्सोहन देणे.<br>16)रस्ते झाडून संकलीत करण्यात आलेला कचऱ्याची विल्हेवाट व गटार सफाईतुन निघालेला गाळ यांची विल्हेवाट लावणेसंबधी दुय्यम तात्पूरती साठवणूक करणेसंबधी तरतुद करणे.<br>17)जनतेमध्ये घनकचरा व्यवस्थापन जागृती करणेसंबधी IEC संबधी घनकचरा व्यवस्थापन स्वतंत्र कक्ष स्थापन करणे व लोकशिक्षण करुन, मानवी स्वभावात बदल करणे संबधी धोरण आखणे. (Education, Comunication & changing in Behaviar) |
| | सुक्ष्म कामे (Micro) | 1. ओला व सुका कचरा वाहतुकीच्या कामाचे नियोजन करणेकरीता, वाहनाची मार्गक्रमणिका तयार करणे त्यांच्या वेळेची नियोजन करणे.<br>2. वाहनाचे (vechile movement ) GPRS व GPS System चा वापर करुन vechile tracking करणे व नियोजित वेळ व प्रत्यक्ष कचरा वाहतुकीच्या कामातील वेळ यांच्या मध्य होणारी तफावत तपासून, कमीत कमी वेळात कचरा वाहतुक कार्यक्षम पणे केली जाईल याबाबत नियमन व नियोजन करणे.<br>3. कचरा वाहतुकीच्या वाहनावर बसविण्यात आलेल्या RFID Technology चा व GPRS व GPS system चा वापर करुन, बिन्स मधील कचरा निर्धारित वेळेत उचलण्यात आला काय? याबाबत इलेक्टॉनिक माध्यमाच्या सहाय्याने पर्यवेक्षण करणे व परिचालन करणे.<br>4. ओला कचरा व सुका कचरा, हरित कचरा व किरकोळ कचरा तसेच हेवी रिसायकलेबल कचरा स्वतंत्र रित्या वाहतुक करणेसंबधी वाहनाची मार्गक्रमणिका निश्चित करणे. व इलेक्ट्रॉनिक प्रणालीचा व आवश्यक त्या ठिकाणी मनुष्य बळाचा वापर करुन, नागरी सेवा कार्यक्षमपणे नागरिकास देणेकरीता, नियोजन व नियमन करणे.<br>5. समग्र साफसफाई कंत्राटी कामाच्या निविदेतील अटी/शर्ती नुसार, तपासणी फॉर्म विकसीत करणे, केलेल्या कामाची नोंद त्याच दिवशी क्षेत्रीय नोंद पूस्तकात करणे व कामामध्ये सुधारणा घडवून आणणे.<br>6. दैनंदिन गटार सफाई व पावसाळा पूर्व गटार सफाईच्या कामाचे नियोजन करणे, नियमन करणे व निविदेतील अटी/शर्ती नुसार |

| | | |
|---|---|---|
| | | परिचलन करणे व दोषी कंत्राटदारा विरुध्द दंडात्मक कारवाई संबधी कार्यलयीन प्रणाली विकसीत करणे व तिचा वापर करुन कामामध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता आणणे.<br>7. यांत्रिकी रस्ते सफाई (परि-1 व 2) कामाच्या अहवाल संकलन करणे व त्याचे गोषवारे तयार करणे.<br>8. मुख्यालयातील साफसफाई पर्यवेक्षण करणे.<br>9. विभाग व मुख्यालय स्तरावरील पत्र व्यवहार पाहणे.<br>10. शासकिय पत्र व्यवहार पाहणे.<br>11. माहितीचा अधिकार, लोकशाही दिन, जनता दरबार,महासभा, स्थायी समिती बाबतचे पत्र व्यवहार पहाणे.<br>12. MIS रिपोर्टींग. |
| विभाग स्तरावरील | सुक्ष्म कामे (Micro) | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 63 नुसार महानगरपालिकेच्या कर्तव्यांचा व घनकचरा व्यवस्थापन (हाताळणी) नियम 2016 ची अंमलबजावणी करणेकरीता, राज्य शासनाच्या निर्देशानुसार, खालील प्रमाणे अंतर्भाव करण्यात आलेला आहे.<br>1. शहरातील निवडक रस्ते, पदपथ व जागा यांची झाडलोट व साफसफाई करणे आणि तेथुन केरकचरा काढून नेणे; बाबतची अंमलबजावणी करणे.<br>2. शहरातील गृहनिर्माण संस्था, औद्योगिक युनिट, शैक्षणीक व वाणिज्य संकुले येथुन निर्माण होणाऱ्या कचऱ्याची वाहतुक करणे व त्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणेबाबतची अंमलबजावणी करणे.<br>3. नाले व निस्सारणाची कामे करणे व तत्सम सोई करणे, सुस्थितीत ठेवणे व त्याची साफसफाई करणेबाबतची अंमलबजावणी करणे.<br>4. पावसाळा पूर्व नैसर्गिक नाल्यातील अडथळे दूर करुन पाणी प्रवाहीत करणेबाबतची अंमलबजावणी करणे.<br>5. घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम 2016 ची जाहिरात करुन जनजागृती करणे.<br>6. कचरा निर्मीतीच्या ठिकाणची यादी अद्यावत करुन कचरा निर्मीती करणाऱ्या विविध घटकांचा सहभाग घनकचरा व्यवस्थापनांमेध्ये करुन घेणे व कचऱ्याचे पृथ्थकरण करण्याचे प्रशिक्षण संबधितांस देणे . |

| | | |
|---|---|---|
| | | 7. नमुमपाने तयार केलेल्या समग्र टेंडर पध्दतीमध्ये नमूद केलेल्या अटी/शर्ती प्रमाणे साफ सफाई कामाची प्रभावी पणे अंमलबजावणी विभाग स्तरावरुन करणेसाठी विभाग स्तरावरुन होत असलेल्या दैंनदिन नागरी सेवा पर्यवेक्षन(डेली मॉनिटरींग ऑफ सिव्हील सर्व्हिसेस रिपोर्ट) प्रमाणे प्रत्येक दिवशी संगणकात नोंद केलेल्या अहवालाच्या गोषवा-याची उलट तपासणी (cross checking) करणे अंतिम अहवाल स्वच्छता अधिकारी यांनी तयार करुन प्रत्येक दिवशी अहवालाची एक प्रत संबधित विभागीय अधिकारी यांना सादर करावी.<br>8. साफ सफाई कामाच्या देयकावर स्वच्छता अधिका-यांनी स्वता:चा अभिप्राय नोंेदण्यापूर्वी एकुण प्रत्यक्षात दिलेल्या भेटीतील तपासणी अहवाल नुसार कपात करावयाची दंडात्मक रक्कम इ.बाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंेदवून साफ सफाई देयकाची रक्कम पारित करणे.<br>9. घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा वेगवेगळा साठविणेकरीता, प्रचार प्रसारण करणे व उक्त नियमातील तरतुदीनुसार साठविण्यात आलेल्या ओल्या व सुक्या कचऱ्याची स्वतंत्र रित्या वाहतुक, कचरा वाहतुक कंत्राटदाराकडून करुन घेणे.<br>10. घनकचरा व्यवस्थापन (हाताळणी) नियम 2016 मधील तरतुदी नुसार Self Help Group यांचा ओला व सुका कचरा वेगवेगळा साठविण्याच्या अभियानात सक्रीय सहभाग घेणे व अभियान लोक सहभागातुन प्रभावीपणे राबविणे.<br>11. सार्वजनिक ठिकाणी सार्वजनिक रस्ते, पदपथ इत्यादी ठिकाणी केरकचरा व तत्सम पदार्थ व उघड्यावर शौच करणाऱ्या व्यक्ती/संस्था विरुध्द दंडात्मक कारवाई करणे.<br>12. सार्वजनिक शौचालय, मुताऱ्या व नमुंमपाच्या उद्यानातील सार्वजनिक शौचालयातील देखभाल दुरूस्तीच्या कामाचे नियोजन करणे व नियमन करणे.<br>13. 5000 चौ.कि.मि. पेक्षा जास्त मोठ्या भुखंडावर वसलेल्या गृहनिर्माण संस्थे मधून निघणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट पध्दतीचा वापर करुन, खत निर्माण करणे किंवा बायोगॅस तयार करणे संबधी गृहनिर्माण संस्थाच्या पदाधिकाऱ्यांना प्रोत्साहन देणे.<br>14. 50 मायोक्रोन पेक्षा कमी जाडीच्या प्लॉस्टिक पिशव्या विक्रेत्या |

| | | |
|---|---|---|
| | | विरुध्द व वापरणाऱ्या विरुध्द प्रभाग अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली कारवाई करणे.<br>15. स्वच्छता निरीक्षक व उप स्वच्छता निरिक्षक यांच्या कामावर तांत्रिक पर्यवेक्षण करणे त्यांच्या कामाचे नियोजन करणे व नियंत्रण करणे.<br>16. विभाग प्रमुख व प्रभाग अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी सांगतील ते कामे करणे.<br>17. ज्या कंत्राटदाराने रोजंदारी वरील /नाक्यावरील कामगार कामास लावले आहे त्यांची सुध्दा त्या गटातील नमुंमपाच्या स्वच्छता निरिक्षक/उपस्वच्छता निरिक्षक यांच्या समक्ष हजेरी घेण्यात यावी.<br>18. समग्र साफसफाई कामाच्या गटनिहाय कामगारांस कंत्राटदाराच्या निविदेत मंजूर करण्यात आल्यानुसार साहित्य दररोज वापरतात अगर कसे ? या बाबतचा अहवाल दररोज अद्यायवत ठेवावा.<br>19. समग्र साफसफाई कंत्राटदाराने आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्री न पुरविल्यास सबंधीत कंत्राटदाराविरुध्द विभाग स्तरावरुन प्रथमत: नोटिस बजावण्यात यावी व 03 नोटिसीनंतरही कामात सुधारणा न झाल्यास सदर कंत्राटदाराचे काम काळया यादीत टाकणेसाठी नस्ती मुख्यालय घनकचरा व्यवस्थापन विभागास प्रस्तावित करावी.<br>20. GPRS/GPS/RFID कार्यप्रणालीचा उपयोग करुन वाहनांची Live Movement दररोज तपासणी करावी व निर्धारित कालावधीत कचरा उचलणे करीता कंत्राटदाराची वाहने न आल्यास किंवा काही अडचणी असल्यास तात्काळ मे ए.जी.इनव्हायरो प्रो. प्रॉ लि. यांचेशी संपर्क साधावा. संपर्क साधुनही तक्रार सोडविण्यात आली नाही किंवा वाहन उपलब्ध करुन दिले नाही तर करारनाम्यातील अटीशर्तीप्रमाणे दंडात्मक करावी.<br>21. GPRS/GPS/RFID कार्यप्रणालीचा चा उपयोग करुन आपल्या कार्यक्षेत्रातील कचरा उचललेला व न उचललेल्या बिन्स ची माहिती करुन घ्यावी व ज्या बिन्सची नोंद या प्रणालीत उपलब्ध नाही त्या सोसायटयांना प्रत्यक्ष भेट दयावी व नमुंमपाने पुरविलेल्या बिन्स मध्येच कचरा साठविणे बाबत लेखी पत्रव्यवहार करावा. |

| | | |
|---|---|---|
| | | 22.गाव-गावठाण, झोपडया व उपभोगाच्या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या 1.1 क्षमतेच्या G.I बिन्स नजिकच्या काळात निष्कासित करावयाच्या असून (Bins Free City) त्याकरीता आतापासूनच गाव, गावठाण व झोपडपटी विभागामध्ये 24x7 या कालावधीत विभाग कार्यालयासाठी उपलब्ध असलेल्या mini tipper ला घंटा बसवून घरोघरी कचरा संकलन करण्याची सवय नागरीकांस आतापासूनच लावावी.<br>23.हरित कच-याचे प्रमाण पावसाळयामध्ये मोठया प्रमाणवर वाढत असल्याने प्रत्येक गृहनिर्माण संस्था यांना त्यांची वृक्ष छाटणी केलेल्या फांदया सोसायटीच्या आवारात जमा करुन ठेवण्यासाठी उद्यान सहायक मार्फत आदेशित करावे.<br>24.उद्यान विभागामार्फत सावजनिक रस्त्याच्या कडेला असलेल्या वृ्क्षाच्या फांदया व दुभाजकाजवळील शोभेच्या झाडांची छाटणी करुन कचरा रस्त्यावर, दुभाजकाजवळ टाकून ठेवला जातो. अशावेळी सबंधीत उद्यान सहायक यांचेशी संपर्क साधुन त्वरीत हरित कचरा उचलण्याची कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.<br>25.उद्यान विभागामार्फेत वृक्षांच्या फांदया व उद्यानातील गवत तसेच दुभाजकामधील वृक्षाची छाटणी करणे पुर्वी कचरा वाहतूक कंत्राटदारामार्फेत पुरविण्यात आलेल्या वाहनामार्फेत वेळीच हरित कचरा उचलणे शक्य व्हावे म्हणुन सबंधीत स्वच्छता अधिकारी व उद्यान सहायक यांनी समन्वय साधुनच वृक्ष छाटणीची परवानगी दयावी किंवा वृक्ष छाटणी करावी.<br>26.गांव-गावठाण, झोपडपटी ठिकाणी ओला व सूका कचरा वेगवेगळा साठवणे करीता जनजागृती करणे साठी मोहिम आखण्यात यावी व विभागातील उपद्रव शोध पथकाच्या वाहनामार्फेत प्रचार व प्रसार चालूच ठेवावा जेणेकरुन सततच्या प्रक्रियेतून नागरीकांमध्ये जनजागृती होईल व ओला व सूका कचरा साठविणेसाठी नागरीकांचे मत परिर्वतन करणे सोपे जाईल.<br>27.ज्या क्षेत्रामध्ये औद्योेगिक वसाहती ( MIDC ) भाग येतो. तेथील कंपन्यामधुन ओला व सूका कचरा वेगवेगळा साठविणे करीता विभाग कार्यालयाकडून कंपनी व्यवस्थापनास बिन्स खरेदी करणेबाबतचे पत्र दयावे, कंपनी व्यवस्थापन स्वत:च्या निधीतून HDPE फायबर बिन्स खेरेदी केल्यास अश्या बिन्सला |

| | | |
|---|---|---|
| | | कचरा वाहतूक कंत्राटदार मे ए.जी. इनव्हायरो प्रो. प्रा. लि. यांचेकडून RFID चिप्स बसविणे व कंपनीच्या व्यवस्थापनाची माहिती नोंदण्याची कार्यवाही करावी. अशा प्रकारे MIDC क्षेत्रात ठेवण्यात आलेल्या 1.1 क्षमतेच्या कम्युनिटी बिन्स निष्कासित करणे करीता नियोजनबध्द कार्यवाही करावी. |

**उप आयुक्त (घकव्य)**
**नवी मुंबई महानगरपालिका**